| | |
|---|---|
| MHKO110001722026 | **नियमित दिवाणी दावा नं. ०९/२०२६**<br>**शामराव दत्तु परीट वगेरे**<br>**वि.**<br>**हौसाबाई गणपती परीट वगैरे** |

## निशाणी क्रमांक १७ वर आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता, क्रम २२ नियम ४, क्रम १ नियम १० सह क्रम ६ नियम १७ अन्वये दावा दुरूस्ती करणेकामी दाखल केलेला आहे.

**०२.** वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी दि. १२/०१/२०२६ रोजी वाटप, हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी प्रतिवादींविरुध्द दाखल केला आहे. प्रस्तुत दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. ४ वसंत लक्ष्मण नरंदेकर हे दि. ०४/०२/२०२६ रोजी मयत झालेले आहेत. सबब, न्यायाच्या कारणास्तव त्यांचे वारस प्रस्तुत कामी अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्याचबरोबर प्रतिवादी क्र. ६ यांचे नाव टंकलेखनाच्या चुकीमुळे 'धोंडीराम प्रकाश पाटील' ऐवजी 'धोंडीराम प्रकाश चव्हाण' असे नमूद झालेले आहे. तसेच प्रतिवादी क्र. ८ व ९ यांचा पत्ता देखील दुरुस्त करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

**०३.** प्रतिवादी क्र. ५, ७ व १० यांनी प्रस्तुत अर्जाखाली त्यांचे म्हणणे दाखल करुन वादी यांची सर्व कथने नाकारली आहेत. प्रतिवादी कथन करतात की, वादी यांना दाव्याबाबत संपूर्ण माहिती असूनदेखील त्यांनी जाणुनबुजून खोटे कारण नमूद करुन प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सबब, वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**०४.** वादी यांनी केलेली कथने विचारात घेता अर्जाचे निकाल निश्चीतीकरिता खालील वादप्रश्न उपस्थित झाले त्यांचेवरील निष्कर्ष आणि कारणमिमांसा खालीलप्रमाणे–

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित सुधारणा मंजूर करणे न्यायोचित ठरते का ? | **होय** |
| २. | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र. १ करिता : –**

**०५.** वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाटपासाठी, हक्कज्ञापनासाठी व कायम मनाईकरीता प्रतिवादींविरुध्द दाखल केला आहे.

**०६.** दिवाणी प्रकिया संहिता क्रम ६ नियम १७ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दाव्याच्या कोणत्याही स्थितीमध्ये कोणताही पक्षकार त्याच्या कथनामध्ये जर दाव्याचे मुळ स्वरूप बदलत नसेल तर आवश्यक ती दुरूस्ती करू शकतो. सदरची दुरूस्ती ही पक्षकारांचा मुळ प्रश्न उकल करण्याकरिता गरजेची असणे आवश्यक आहे.

**०७.** दावा प्रलंबित असताना घडलेल्या घटनांमुळे वादी यांनी सदरचा दावा दुरुस्त करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. दाव्यातील खराखुरा वाद गुणदोषांवर निर्गत करण्यासाठी, दावा मिळकतीशी संबंधीत संपूर्ण माहिती व संबंधीत सर्व पक्षकार हे दाव्यात सामील असणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीमध्ये सदरचा अर्ज मंजूर करून वादींना त्यांच्या वादकथनांमध्ये सुधारणा करण्यास मंजुरी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही, कारण प्रतिवादीला वादीच्या वाद कथनांमध्ये झालेल्या सुधारणेनुसार जादा कैफियत व त्या अनुषंगाने त्यांचा जादा पुरावा देण्याची मुबलक संधी आहे. उलटपक्षी दाव्याचा गुणदोषावर अंतिम न्यायनिवाडा करणेकामी प्रस्तावित

सुधारणा करून आवश्यक पक्षकार यांना दाव्यात सामील करणेही क्रमप्राप्त आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता वादप्रश्न क्र.१ करिता मी होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>वादप्रश्न क्र. २ करिता</u> :–**

**०८.** वादीने अर्जात मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देणेत येते. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रूपये ५००/–(रुपये पाचशे फक्त) प्रतिवादी यांना दिल्यानंतर मंजूर करण्यात येतो. सबब, वादप्रश्न क्र. २ चे निष्कर्षाकरिता खालीलप्रमाणे आदेश पारित करणेत येतो–

**<u>आदेश</u>**

१. अर्ज (निशाणी क्र. १७) मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जाच्या खर्चापोटी प्रतिवादी यांना रक्कम रूपये ५००/–(रुपये पाचशे फक्त) द्यावेत.

JYOTI NITIN BHASME

Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2026.04.24 14:48:41 +0530

**( जे.एन. भस्मे )**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठ–वडगांव.**

**पेठ–वडगांव.**
**दिनांक २४/०४/२०२६**